७४६९

जा.क्र./थेट पणन/ऑनलाईन परवाना/संगणक प्रणाली/२०१६
पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३ रा मजला, मध्यवर्ती इमारत, पुणे- ०१
दि:- १६/०९/२०१६

# : परिपत्रक :

## विषय :- थेट पणन, खाजगी बाजार व सिंगल लायसन करीता ऑनलाईन अर्ज करणेबाबत मार्गदर्शक सुचना.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ५(डी) व नियम १९६७ मधील नियम ४(बी) नुसार थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करण्यासाठी थेट पणन लायसन व नियम ४(सी) नुसार खाजगी बाजाराचे लायसन पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाकडून दिले जाते. सदर लायसन घेण्याकरीता विहीत नमुन्यात अर्ज पणन संचालनालय कार्यालयामध्ये सादर करावा लागतो. सदर लायसन घेण्यासाठीची प्रक्रीया सुलभ करण्यासाठी लायसन घेण्याबाबतची प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली असून त्यासाठी ऑनलाईन संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. थेट पणन, खाजगी बाजार व सिंगल लायसन घेण्याकरीता यापुढे ऑनलाईन अर्ज व त्याअनुषंगाने लागणारी आवश्यक कागदपत्रे अपलोड/ सादर करावीत.

थेट पणन, खाजगी बाजार व सिंगल लायसनसाठीचे अर्ज ऑनलाईन सादर करण्याकरिता मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१) www.msamb.com या वेबसाईटच्या होम पेजवर Directorate of Marketing या पर्यायाअंतर्गत थेट पणन (Direct Marketing), खाजगी बाजार (Private Market), व सिंगल लायसन (Single Licence) यापैकी आवश्यक त्या लिंकवर क्लिक करावे.

किंवा

१) https://mahapanan.maharashtra.gov.in या वेबसाईटच्या होमपेजवर Online Licence या पर्यायाअंतर्गत थेट पणन (Direct Marketing), खाजगी बाजार (Private Market), व सिंगल लायसन (Single Licence) यापैकी आवश्यक त्या लिंकवर क्लिक करावे.

२) नवीन अर्ज करण्यासाठी प्रथम New Registration या बटनावर क्लिक करावे. जर यापूर्वी Registration केलेले असेल तर युजरनेम व पासवर्डचा वापर करुन लॉगीन करावे.

३) रजिस्ट्रेशन करताना लायसन टाईप या पर्यायामधून ज्यासाठी लायसन घ्यावयाचे आहे तो पर्याय निवडावा. त्यानंतर Application Category, Name, Address, State, District, Contact

Person, PAN No., Adhar No., Mobile No., E-mail ID, Login इत्यादी माहिती अचूक भरावी व सादर करणेकरीता Submit या बटनावर क्लिक करावे.

४) रजिस्ट्रेशन केल्यानंतर पडताळणीसाठी युजरच्या मोबाईलवर त्वरीत OTP (One Time Password) SMS द्वारे पाठविला जाईल.

५) संगणकाच्या स्क्रिनवर एक नवीन विंडो दिसेल व यामध्ये SMS द्वारे प्राप्त झालेला OTP टाकावा.

६) अर्जदाराची OTP पडताळणी झाल्यावर अर्जधारकास त्याने नोंदविलेल्या मोबाईलवर SMS द्वारे युजरनेम व पासवर्ड पाठविला जाईल.

७) SMS द्वारे आलेला युजरनेम व पासवर्ड वापरुन लॉगीन करावे, प्रथम लॉगीन केल्यानंतर पासवर्ड बदलणे अनिवार्य आहे.

८) युजरनेम व नवीन पासवर्डचा वापर करुन लॉगीन करावे व ऑनलाईन अर्ज सादर करावा.

सदर परिपत्रकीय सुचनांना सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. तसेच ऑनलाईन अर्ज सादर करणाऱ्यांना काही अडचणी आल्यास त्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन करावे. याकामी पणन मंडळाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांची आवश्यक त्या ठिकाणी मदत घेण्यात यावी.

**पणन संचालक**
**महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना-**

१. विभागिय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. उपनिबंधक/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सर्व)